# सी.एम. ए. ही वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी- श्री सोहम कवडे

"स्वप्न पाहायचंच तर मोठी स्वप्न पहा छोटी स्वप्न पाहणे म्हणजे गुन्हा, या अब्दुल कलाम यांच्या विधानाचा दाखला देत कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट (सी.एम.ए.) कोल्हापूर-सांगली चाप्टरचे सदस्य श्री. सोहम कवडे यांनी श्री व्यंकटेश महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना 'सी.एम.ए. अभिमुखता' कार्यक्रमामध्ये सी.एम.ए. कोर्स विषयी मार्गदर्शन केले." सी.एम.ए. हा वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना उत्तम करिअरचा पर्याय असून मोठ्या पगाराच्या नोकऱ्यांची संधी यामध्ये उपलब्ध आहेत, परंतु त्यासाठी विद्यार्थ्यांनी कष्टाने व जिद्दीने सी.एम.ए. कोर्सचा अभ्यास करणे आवश्यक आहे असे ते म्हणाले. सी.एम.ए. एक असे क्षेत्र आहे ज्यामध्ये अजूनही स्पर्धा नाही विद्यार्थ्यांसाठी एक नवीन करिअरचा मार्ग असून विद्यार्थ्यांनी या क्षेत्राकडे वळावे असे आवाहन त्यांनी केले. सी.एम.ए. केल्यानंतर केवळ नोकरी न करता स्वतःची प्रॅक्टिस देखील सुरू करता येते त्यामुळे नोकरीसोबतच व्यवसाय म्हणून देखील या क्षेत्राकडे पाहता येते आणि त्यामुळे अगदी कमीत कमी खर्चामध्ये केवळ तीन परीक्षा पास होऊन सी.एम.ए. झाल्यानंतर मोठ-मोठ्या कंपन्यांमध्ये नोकरी करता येते असे ते म्हणाले. आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानामध्ये त्यांनी सी.एम.ए. कोर्स, अभ्यासक्रम, परीक्षेचे स्वरूप आणि उपलब्ध असणाऱ्या संधी इ. बद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. तर कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रामध्ये श्री. विजय पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. प्रश्नोत्तराचे सत्र पार पडले, त्यामध्ये विद्यार्थ्यांनी प्रश्न व शंका विचारले. तर आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय माने यांनी सी.एम.ए. परीक्षेचे महत्त्व सांगत व्यंकटेशचे दहापैकी पाच विद्यार्थी सी.एम.ए. फाउंडेशन परीक्षेमध्ये यशस्वी झाले ही महाविद्यालयासाठी गौरवाची बाब आहे. सी.एम.ए. हा विद्यार्थ्यांसाठी निश्चितच चांगले उत्पन्न मिळवून देणारा कोर्स असून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या कोर्ससाठी नोंदणी करून याचा लाभ घ्यायला हवा असे प्रतिपादन त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस महाविद्यालयातील वाणिज्य विभागप्रमुख डॉ. बी. एन. कांबळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. कार्यक्रमाच्या शेवटी सहाय्यक प्राध्यापक एस. बी. मलगान यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी कॉमर्स विभागातील सहाय्यक प्राध्यापक टी.एच. नायकवडी, टी. एन. मुल्ला व एच. व्ही. कांबळे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमांमध्ये बी. कॉम. बी.बी.ए. व बी. कॉम. आयटी. चे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी भक्ती गुरव हिने  केले.


SYLLABUS 2022
THE INSTITUTE OF
COST ACCOUNTANTS OF INDIA
CMA COURSE GOING GLOBAL
MENTORING FUTURE-READY
PROFESSIONALS
YMI/Podium/2018-19/01
Shri N.B.Education Society's
Shri Venkatesh Mahavidyalaya,